




सायं दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६४ वा | सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# SIR विरोधात देशव्यापी रान उठलं, गल्ली ते दिल्ली ज्ञानेश कुमारांविरोधात संतापाचा उद्रेक

नवी दिल्ली (वृत्त सेवा):- चौफेर गंभीर आरोपांनी घेरलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाने कामकाजाशी संबंधित अनेक नियमांमध्ये सुधारणा केली आहे. काल शनिवारी झालेल्या आयोगाच्या बैठकीत नऊ निर्णय घेण्यात आले, ज्यात मतदार सुनावणी, आयटी प्रणाली, अधिकाऱ्यांचा परदेश प्रवास आणि आयोगाच्या बैठकीच्या कार्यपद्धतीशी संबंधित बदलांचा समावेश आहे.

अंतर्गत बंडाळीच्या दाव्यांदरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यासह दोन्ही निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी हे बैठकीला उपस्थित होते. आयोगाने संबंधित निर्णय एकमताने घेण्यात आल्याचा दावा केला.

दुसरीकडे, इंडियन एक्सप्रेसच्या एका वृत्तानुसार, गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर १४ वेळा आक्षेप घेतला होता, परंतु कोणतीही सुनावणी झाली नाही. या वृत्तानंतर आयोगाने हे निवेदन जारी केले आहे. सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी कॅबिनेट सचिवांना पाठवलेली पत्रे प्रतिनियुक्त अधिकाऱ्याशी संबंधित होती, असा दावा आयोगाने केला. दुसरीकडे, इंडियन एक्सप्रेसने दावा केला आहे की, संधू आणि जोशी यांनी त्या आदेशाला आक्षेप घेतला होता, ज्यामध्ये मतदार यादीत नावे समाविष्ट करणे, वगळणे आणि अद्ययावत करण्याचे अधिकार केंद्रीय स्तरापुरते मर्यादित ठेवण्याचा धोका होता.

आयोगाने म्हटले आहे की, संबंधित अधिकाऱ्याने जारी केलेल्या कर्तव्यांच्या पुनर्वितरणाच्या आदेशांची कधीही अंमलबजावणी झाली नाही. आयोगाने स्पष्ट केले की, निवडणूक आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल. ECINET ची तपासणी करण्यासाठी एका वरिष्ठ उप निवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, IIT/IIIT मधील एका स्वतंत्र तज्ज्ञाचा समावेश असलेली एक समिती स्थापन केली जाईल.

निवडणूक आयोगाचे एकाच



बैठकीतील ९ निर्णय

१. बैठकीपूर्वी अजेंडा

प्रत्येक बैठकीचा अजेंडा आधी सर्व सदस्यांना दिला जाईल.

२. निर्णयांची नोंद

बैठक संपल्यानंतर घेतलेल्या निर्णयांचे इतिवृत्त तयार केले जाईल.

३. परदेश दौऱ्यासाठी मंजुरी

अधिकाऱ्यांना परदेशात जाण्यापूर्वी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल.

४. नवीन IT प्रणालीची तपासणी- नवीन पोर्टल आणि IT मॉड्यूल आयोगासमोर सादर करण्यापूर्वी अधिकाऱ्यांची समिती त्याची तपासणी करेल.

५. ECINET चा आढावा

वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती याची तपासणी करेल. यामध्ये IIT किंवा IIIT चा स्वतंत्र तज्ज्ञही असेल.

६. क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पूर्ण प्रवेश

गरजेनुसार अधिकाऱ्यांना प्रणालीमध्ये काम करण्याची पूर्ण सुविधा दिली जाईल.

७. आयुक्तांच्या निर्देशांचे पालन बंधनकारक

अधिकाऱ्यांना निवडणूक आयुक्तांच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

८. मतदार डेटाची स्वतंत्र तपासणी

मतदार यादीतील डेटा आणि प्रणालीचे स्वतंत्र तज्ज्ञांकडून ऑडिट करून घेतले जाईल.

९. विभागाच्या कामात स्पष्टता

विभागाशी संबंधित कामे

**मात्र, आयोगाच्या दाव्यानंतर अजूनही प्रश्न अनुत्तरित**

**- नवीन निर्णय होऊनही, ऑनलाइन फॉर्म ६ मध्ये पालकांसंबंधीचा प्रश्न का समाविष्ट करण्यात आला होता, हे अस्पष्ट आहे. तसेच, तो कोणी समाविष्ट केला होता आणि तो आता काढून टाकण्यात आला आहे की नाही, हे देखील अस्पष्ट आहे.**

**- पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीत समाविष्ट केलेल्या अंदाजे १६ लाख नावांविरुद्ध अपील करण्याचे आदेश कोणी दिले, हा प्रश्न अनुत्तरित आहे.**

**- याव्यतिरिक्त, गोव्यामध्ये मतदारांची नावे पुनर्संचयित करण्यासाठीचे सॉफ्टवेअर फिचर का सक्रिय केले गेले नाही आणि आयटी विभागाच्या काही अधिकाऱ्यांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर काय कारवाई करण्यात आली, याबद्दल नवीन निर्णयांमध्ये माहिती दिलेली नाही.**

**(पान २ वर)**

# लष्कर विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाची विसर्जन मिरवणुक तब्बल १६ तास उत्साहात संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- लष्कर विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाची विसर्जन मिरवणूक अत्यंत उत्साहपुर्वक वातावरणात संपन्न झाली. शुक्रवार सकाळी दि. २५/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता लष्कर मध्यवर्तीची मानाचा क्षत्रिय लोधी समाजाचा जय तिरूपती क्रीडा सेवा मंडळाचा पालखी पूजन मा. पोलीस आयुक्त, एम. राजकुमार यांच्या शुभहस्ते, राज्यसभा खासदार डॉ. ज्योतीताई वाघमारे, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, सहा. पोलीस आयुक्त, विजयालक्ष्मी कुर्री, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अरविंद माने, गुन्हे शाखेचे सहा. पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर, उपमहापौर इ गनेश्वरी देवकर, सदर बझार व.पो.नि. लकडे, नगरसेवक सर्वश्री प्रा. नरसिंह आसादे, भारत बडुरवाले, रवि कैय्यावाले, प्रियदर्शन साठे, कल्पना कदम, श्वेता खरात, लष्कर मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाचे संस्थापक प्रकाश पारसवार, देवेंद्र भंडारे, अब्राहम कुमार, लक्ष्मणसिंग बंबेवाले, मध्यवर्ती महामंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. प्रदीपसिंह राजपूत, ट्रस्टी अध्यक्ष रामचंद्र मोतीवाले, ट्रस्टी सचिव- शिवाजी बनसोडे, नूतन अध्यक्ष अशोक बोकेवाले, जनरल सेक्रेटरी नागेश म्हेत्रे, लोधीसमाज अध्यक्ष- भगतसिंग कैय्यावाले, नामदेव मन्सावाले, बेडर समाज अध्यक्ष - धनंजय झंपले, मातंग समाज अध्यक्ष - भिमराव गायकवाड, मोची समाज सुधारक मंडळ अध्यक्ष- विजय मरेड्डी, मोची समाज लष्कर अध्यक्ष - करेप्पा जंगम, यांच्या प्रमुख उपस्थितीत गणेश पालखी पूजन व विसर्जन मिरवणुकीचा शुंभारंभ करण्यात आला. याप्रसंगी माजी अध्यक्ष मन्नुसिंग बाबावाले, आनंद मनसावाले, रवि माने, माजी अध्यक्ष- सागर शिंगे, उपाध्यक्ष प्रताप हुलंजतीवाले, नितीन मुकारे, सिद्राम चोपडे, अंजन मिसालोलु, सहसेक्रेटरी किशोर बाबावाले, राहुल आळसंदे, खजिनदार- धनराज बिरबानवाले, सहखजिनदार - विवेक इंगळे, प्रसिध्दीप्रमुख- मोहन बाडीवाले, स्पर्धा प्रमुख- राजेश कजाकवाले, सज्जान बुऱ्हाणपुरे, श्रीनिवास चन्नेपागोलु, कार्यालय प्रमुख अथर्व माने, राजू जमादार, प्रकाश कुमार, सुरेंद्र शिवसिंगवाले, सर्व आजी माजी अध्यक्ष, पदाधिकारी, आजीव सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगन्नाथ सज्जन यांनी केले.



याप्रसंगी सर्व मान्यवरांचा मानाचा फेटा, पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मानाचा गणपतीची पूजा झाल्यानंतर मिरवणुकीस सुरुवात झाली. मिरवणुकीच्या अग्रभागी जय तिरुपती क्रिडा सेवा मंडळाची मानाचा पालखी टाळमृदूंगाचा सुरेख निनादात वारकरी व मल्लखांब, नेत्रदिपक लेझीमचा खेळ सुरु होता. सदर मिरवणूक बालाजी मठ, नळबझार चौक, मुर्गीनाला, कुंभार गल्ली, मौलाली चौक, जगदंबा चौक, सात रस्ता मार्गे, नियोजन भवन येथे विसर्जन करण्यात आले. सातरस्ता चौक येथे मध्यवर्ती महामंडळाची भव्य स्टेज घालुन मंडळाचे सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महिलांसाठी बसण्यासाठी स्वतंत्र गॅलरीची व्यवस्था करण्यात आली होती. मौलाली चौक ते सातरस्ता या मार्गावर मिरवणूक पाहण्यासाठी नागरीकांची प्रचंड गर्दी होती. यावेळी वीर सावरकर अन्नदाता गणपती मंडळ, जगदंबा चौकात सर्व गणेश भक्तांना महाप्रसाद वाटप केले.

देवेंद्र भंडारे यांच्या नेतृत्वाखाली महावीर तरुण मंडळ, नवशक्ती तरुण मंडळ, सरस्वती तालीम संघ, आंध्र व्यायाम शाळा, गोविंदराज तरुण मंडळ, श्रीकृष्ण तरुण मंडळ, सिंहगर्जना तरुण मंडळ, वनराज तरुण मंडळ, आदिनी लेझीमचा बहारदार खेळ, नेत्रदिपक तसेच या मिरवणुकीत नवी तालीम तरुण मंडळ, तुळशीदास तालीम संघ, नळबझार चौक तरुण मंडळ, रूद्रमुनी तालीम संघ, अंबिका तरुण मंडळ, न्यु क्षत्रीय मंडळ, जय विजय गणेशोत्सव मंडळ, आदिंनी नेत्रदिपक लेझीम, टिपरी, डान्स, डफली आदि या खेळाचे प्रदर्शन केले. सदर मिरवणुक यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सरस्वती अकॅडमी ऑफ अकौंटन्सी च्या श्री गणेशाचे पालखी मिरवणुकीने विसर्जन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सरस्वती अकॅडमी ऑफ अकौंटन्सी, साखर पेठ, सोलापूर येथे गणेशोत्सव २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. गणेशोत्सवानिमित्त अकॅडमीतर्फे श्री गणेशाची भक्तिभावाने स्थापना करण्यात आली होती.

गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी श्री गणेश विसर्जन भव्य पालखी मिरवणुकीचे आयोजन करून करण्यात आले. यावेळी श्री गणेशाची आरती करून सर्वांनी गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.



श्री गणेशाच्या पालखीची आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांची आरास, भगवे ध्वज व विविध सजावटींमुळे मिरवणुकीला विशेष आकर्षण प्राप्त झाले. ढोल-ताशांच्या गजरात व 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने ही मिरवणूक उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत उत्सवाची शोभा वाढवली. संपूर्ण मिरवणूक उत्साह, शिस्त आणि भक्तिभावाच्या वातावरणात पार पडली.

मिरवणुकीमध्ये अकॅडमीचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मिरवणुकीचे नियोजन सरस्वती अकॅडमी ऑफ अकौंटन्सीचे संचालक प्रा. मल्लिकार्जुन परळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# शिक्षक आणि शाळांचा गौरव हा समाजाच्या भविष्याचा सन्मान आहे- मल्हारी माने



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ''विद्यार्थी घडवण्यात आणि समाजाला दिशा देण्यात शिक्षकांचे योगदान अतुलनीय आहे. अशा उपक्रमशील शिक्षक आणि आदर्श शाळांचा गौरव करणे म्हणजे केवळ त्यांचा सत्कार नव्हे, तर समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान आहे,'' असे गौरवद्वार महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने साहेब यांनी काढले. अशी माहिती साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेचे संचालक सुनील चव्हाण यांनी दिली.

साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर यांच्या वतीने आयोजित उपक्रमशील मुख्याध्यापक, गुणवंत शिक्षक, सेवाभावी सेवक व आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. अशोक चौक येथील लोटस मल्टिपर्पज हॉल येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर नरेंद्र गंभीरे, चंद्रकांत अवताडे,मनिष बांगर,संजय साळुंके, राजेंद्र कुलकर्णी, आणि पोलीस उपनिरीक्षक,गुलाब मुल्ला, संतोष माशाळे,सोमेश्वर याबाजी गोपीचंद राठोड, मनोज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यांना मिळाला मानाचा पुरस्कार:

समारंभात सौ. ज्ञानेश्वरी संगीतराव (उपक्रमशील मुख्याध्यापिका), सुगंधा कांबळे, . प्राजक्ता भोसले, सविता फडतरे, उषा क्षीरसागर, सपना पावाडे (गुणवंत शिक्षिका), बलराज धजाल (सेवाभावी सेवक) आणि ज्ञानगंगा प्राथमिक मराठी विद्यालय, मजरेवाडी (आदर्श शाळा) यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पतसंस्थेचे चेअरमन उल्हास बिराजदार, सचिव अप्पाराव इटकेर, फरजाना रचभरे, महादेवी पाटील, वीरभद्र यादवाड विनोद आगलावे भीमराया कापसे, भाऊसाहेब मोरे, शिवानंद हिरेमठ व जयंत गायकवाड विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अल्लाउद्दीन शेख यांनी केले.

# ऊस उत्पादक शेतक-यांना शासनाने अनुदान द्यावे- जयसिंह मोहिते पाटील

अकलूज (कटूसत्य वृत्त):- सध्या सोलापूर जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सरकारने जे शेतकरी सहकारी साखर कारखान्यांना ऊस देतील त्या शेतकऱ्यांना एक हजार रुपये प्रति टन अनुदान द्यावे अशी मागणी सहकार महर्षी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी केली.






सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ मार्गदर्शक संचालक माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी चेअरमन जयसिंह मोहिते पाटील बोलत होते.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील,माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, संचालिका कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील,विश्वतेजसिंह मोहिते पाटील,उपाध्यक्ष शंकरराव माने-देशमुख,आजी व माजी संचालक कार्यकारी संचालक सुहास यादव अधिकारी कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रस्ताविकात कार्यकारी संचालक सुहास यादव यांनी सहकार महर्षी साखर कारखान्याने ठेवलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणा सज्ज ठेवली असून या हंगामात उद्दिष्ट पूर्ण केले जाणार असल्याचे सांगितले.

सहकार महर्षी सोलापूर जिल्ह्यात उसाचा दर देण्यास कमी



पडणार नसल्याची ग्वाही देत जयसिंह मोहिते पाटील पुढे म्हणाले की,जिल्ह्यात कारखान्यांची संख्या वाढली असून खाजगी कारखान्यांन बरोबर सहकारी कारखान्यांबरोबर स्पर्धा करावी लागत असून कमीत कमी दिवसात जास्तीत जास्त उत्पादन घेण्याच्या दृष्टीने कारखाना अत्याधुनिक करणार असल्याचे सांगत कर्मचाऱ्यांना ११ टक्के दिवाळी बोनस जाहीर केला. यावेळी माजी उपाध्यक्ष प्रकाश पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

## संपादकीय

# दुष्काळाचे चटके अन्? व्यवस्थेचे अपयश!

'या दीड एकरात किलोभर दाणे काढून दाखवा, तुम्हाला पोतंभर काजू, बदाम देतो...'

नांदेड जिल्ह्यातील दाभडचे शेतकरी आत्माराम टेकाळे वरील आर्त शब्दांत व्यथा मांडतात आणि सोबत कळकळ... 'सरकारने आमचे प्रश्न समजून घ्यावेत.'

टेकाळे यांच्या दीड एकर शेतात सोयाबीन आहे. शेंगा भरण्याच्या काळात पावसाने दडी मारली अन्? पीक हातातून गेले. आता वाळलेल्या शेंगांकडे बोट दाखवत टेकाळे दुष्काळाची दाहकता सांगतात.

'सोयाबीन, कापूस पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. ऊससुद्धा हातातून गेला आहे. माझ्या आयुष्यात एवढा मोठा दुष्काळ मी बघितला नव्हता', ही प्रतिक्रिया सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची. दुष्काळी भागाची पाहणी केल्यानंतर आपसूकच त्यांच्या तोंडून निघालेले हे उद्गार.

शेतकरी टेकाळे आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या वरील उद्धृतांवरून महारातील दुष्काळाची दाहकता ध्यानात येईल.

'एल निनो'च्या संकटामुळे दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य सरकारने जून महिन्यात एक सर्वंकष कृती आराखडा जाहीर केला होता. पाणी टंचाई व नियोजनावर देखरेख करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'टास्क फोर्स' नेमण्यात आले. जलसंधारण कामांना गती देणे, पाणी वापराचे योग्य नियोजन, जुन्या जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, कमी पावसाच्या स्थितीत शेतकऱ्यांना पेरणीबाबत मार्गदर्शन, चारा टंचाई रोखण्यासाठी वैरण विकास कार्यक्रम, जलव्यवस्थापन व मदतकार्यासाठी निधी उपलब्ध करणे अशा कामांचा कृती आराखड्यात समावेश होता. राज्य सरकारने आता याबाबत जिल्हानिहाय कामांचा आढावा घेतल्यास त्याचे स्वरूप जगजाहीर होईल.

जलसंधारण कामांना गती देताना 'जलयुक्त शिवार २.०' आणि 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनांतील कामांना गती देणे अपेक्षित होते. ही कामे गेल्या चार महिन्यात दिसली नाहीत. परिणामी, पाणी टंचाईचा सामना करण्याशिवाय गत्यंतर नाही. राज्यात एक कोटी ३९ लाख हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली होती. सप्टेंबरपर्यंत पावसाची तूट १७ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. मराठवाडा विभागात सर्वाधिक ३५ टक्के तूट आहे. विदर्भात २८ टक्के आणि कोकणात १२ टक्के पाऊस तूट आहे. पालघर जिल्ह्यात जोरदार पाऊस आणि लगतचा जिल्हा कोरडा अशी तफावत हवामान बदलाचे उदाहरण ठरत आहे.

राज्यातील वीसपेक्षा अधिक जिल्ह्यांत पावसाची तूट ४० टक्क्यांहून अधिक आहे. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाचे चटके जाणवत आहेत. राज्यात सोयाबीनचे सर्वाधिक ४९ लाख हेक्टर क्षेत्र होते. या सर्व क्षेत्राचे नुकसान झाले असून उत्पादनातील घट ८० टक्क्यांपर्यंत गेली आहे. मराठवाड्यात दुष्काळाचे संकट गडद झाले आहे. विभागातील ७६ तालुक्यांत कमी म्हणजे केवळ ६८.५ टक्के पाऊस झाला आहे. तब्बल ३१.५ टक्के तूट आहे. २३ सप्टेंबरपर्यंत ६४०.८ मिलिमीटर पाऊस अपेक्षित असताना केवळ ४३९ मिमी पाऊस झाला आहे. ही २०० मिलिमीटरची तूट कशी भरणार? लातूर जिल्ह्यात केवळ ५२ टक्के पाऊस झाला आहे. परभणीत ५५ टक्के आणि धाराशिवमध्ये ६१ टक्के पाऊस झाला आहे. कमी पावसामुळे खरीप पिकांचे नियोजन कोलमडले आहे. कमी पावसाच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांनी कमी कालावधीत आणि कमी पावसात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्याचे आवाहन कृषी विभागाने केले होते. प्रत्यक्षात पावसाचे प्रमाण इतके कमी राहिले की कमी पावसात येणारी पिकेसुद्धा आली नाहीत.

मराठवाड्यात ४९ लाख ७२ हजार ७६६ हेक्टर क्षेत्रापैकी ४६ लाख १९ हजार २१७ हेक्टरवर खरीप पिके आहेत. या ९३ टक्के क्षेत्रावरील पिके पावसाअभावी पूर्णपणे जळाली आहेत. सरासरी २५ ते ४२ दिवस पावसाचा खंड असल्यामुळे वाढीच्या अवस्थेत पिकांचे नुकसान झाले आहे. उत्पादनातील घट ८० टक्क्यांवर पोहोचली असून अनेक भागांत शेतकऱ्यांनी पिकांत नांगर घातला आहे. परतीचा पाऊस झाल्यास रब्बी हंगामाची पेरणी करण्यासाठी धावपळ सुरू आहे. परतीचा पाऊसही अत्यल्प राहणार असल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. परिणामी, खरीप आणि रब्बी हंगाम शेतकऱ्यांच्या हाती लागण्याची शक्यता नाही.

कमी पावसाचा फटका टप्प्याटप्प्याने बसल्यानंतर पिकांचे नुकसान वाढले. ऑगस्ट महिना पूर्णपणे कोरडा गेल्यामुळे पिकांची वाताहत झाली. ऑगस्ट महिन्यात १९३ मिमी पाऊस अपेक्षित असताना फक्त ५६ मिमी पाऊस झाला. सप्टेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत ८५ मिमी पाऊस अपेक्षित असताना केवळ २२ मिमी पाऊस झाला. दीड महिन्यात कमी पर्जन्यामानामुळे खरीप पिकांची सर्वाधिक हानी झाली आहे, असे कृषी विभागाने जाहीर केले. वाढता खर्च आणि कमी बाजारभाव या पेचात सापडल्यानंतर शेतकऱ्यांनी कापूस पिकाकडे पाठ फिरवून सोयाबीन पिकाला प्राधान्य दिले. पण, या वर्षी सोयाबीन पिकालाही फटका बसल्यामुळे ग्रामीण भागातील अर्थकारण कोलमडणार आहे. मराठवाड्यात सोयाबीनचे सरासरी क्षेत्र २२ लाख ९८ हजार १५५ हेक्टर असून प्रत्यक्षात पेरणी २५ लाख ७४ हजार ७८१ हेक्टरवर झाली आहे. लातूर जिल्ह्यात चार लाख ७९ हजार ५३८ हेक्टर आणि धाराशिव जिल्ह्यात चार लाख ६७ हजार ३२२ हेक्टर क्षेत्र आहे. जिल्ह्यात एकूण क्षेत्रापैकी ८६.७० टक्के क्षेत्रावर सोयाबीन आहे. सोयाबीनचे उत्पादन वाढल्यामुळे लातूर परिसरात तेल उद्योगांची संख्या वाढली आहे. मध्य प्रदेशानंतर मराठवाड्यात सोयाबीनचे जास्त उत्पादन होते. त्याला यंदाचे वर्ष अपवाद ठरले आहे.

हवामान बदलाचे संकट वाढत असतानाही पीक पद्धती, जल व्यवस्थापनाचे धोरण बदललेले नाही. परिणामी, चारा टंचाई होत असताना लाखो जनावरे जगवायची तरी कशी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. 'चारा छावणी' हा दुष्काळातील सोपा उपाय असला तरी चारा सहजतेने उपलब्ध न होण्याचे संकट कायम आहे. ज्वारी, बाजरी या पिकांपासून कडबा मिळतो. मात्र, या पिकांचे क्षेत्र घटत आहे. या वर्षी पावसाअभावी रब्बी ज्वारी घेणेसुद्धा शक्य नसल्यामुळे चारा टंचाई जाणवणार आहे. पाऊस कमी असल्यामुळे १५ ऑक्टोबरपासून ऊस गाळप हंगाम सुरू होणार आहे. हा हंगाम दोन महिन्यांत आटपू शकतो. परिणामी, ऊसतोड करून चरितार्थ चालवणाऱ्या लाखो कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे.

# माहितीचा अधिकार : लोकशाहीची पारदर्शक खिडकी

लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर शासनाच्या कारभाराविषयी जाणून घेण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करण्याचा नागरिकांचा अधिकारही होय. शासनाच्या निर्णयांची माहिती नागरिकांपासून दूर राहिली, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पारदर्शकता राहिली नाही आणि प्रशासनाच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारण्याची संधी मर्यादित झाली, तर लोकशाहीची प्रक्रिया केवळ औपचारिक ठरू शकते. म्हणूनच लोकशाहीमध्ये माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांना केवळ कागदपत्रे देणे नव्हे, तर सार्वजनिक जीवनात अधिक अर्थपूर्ण सहभागाची संधी देणे होय. याच व्यापक संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करणारा २८ सप्टेंबर हा 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' म्हणून जगभर पाळला जातो.

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेने म्हणजेच युनेस्कोने माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २८ सप्टेंबर हा दिवस निश्चित केला. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि प्रभावी प्रवेश हा शाश्वत विकास, लोकशाही सहभाग, सामाजिक समावेशन आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे या दिवसाच्या निमित्ताने अधोरेखित केले जाते. माहिती ही आजच्या ज्ञानाधारित समाजातील मूलभूत सामाजिक संपत्ती बनली आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक धोरणे अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात योग्य वेळी मिळणारी अचूक माहिती व्यक्तीच्या निर्णयक्षमतेवर परिणाम करते.

भारताच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' हा भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील महत्त्वाचा कायदा मानला जातो. या कायद्याचा मुख्य उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखाली असलेल्या माहितीपर्यंत नागरिकांना प्रवेश उपलब्ध करून देणे आणि शासनव्यवस्थेत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणे हा आहे. सार्वजनिक कामकाजात पारदर्शकता वाढल्यास नागरिकांना शासनाच्या निर्णयांची प्रक्रिया समजून घेणे, सार्वजनिक निधीचा वापर तपासणे आणि प्रशासनाकडून अपेक्षित उत्तर मागणे अधिक सुलभ होते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा प्रशासनावरील अविश्वासाचे प्रतीक नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाची संस्थात्मक व्यवस्था म्हणून पाहणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार नागरिकाला शासनाच्या दैनंदिन कामकाजाशी जोडतो. एखाद्या गावात रस्ता बांधण्यासाठी निधी मंजूर झाला असेल, पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली असेल, शासकीय इमारतीचे बांधकाम झाले असेल किंवा एखाद्या कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी सुरू असेल, तर त्या कामाशी संबंधित उपलब्ध अधिकृत नोंदींबाबत नागरिक माहिती मागू शकतो. मंजुरीचे आदेश, खर्चाशी संबंधित नोंदी, कामाची प्रगती, उपलब्ध अहवाल किंवा कायद्याच्या चौकटीत येणारी इतर माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक उत्तरदायित्वाचा आधार बनू शकते. अशा प्रक्रियेमुळे 'शासन काय करते?' हा प्रश्न केवळ चर्चेचा विषय न राहता अधिकृत नोंदींच्या आधारे तपासता येण्याजोगा ठरतो.

या कायद्याचे महत्त्व विशेषतः ग्रामीण भारताच्या संदर्भात अधोरेखित होते. गावातील नागरिकांना पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार, घरकुल, सामाजिक सुरक्षा आणि विविध शासकीय योजनांशी संबंधित अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. एखादी योजना कागदावर उपलब्ध असली, तरी तिची माहिती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही तर त्या योजनेचा अपेक्षित सामाजिक परिणाम मर्यादित राहू शकतो. त्यामुळे शासनाच्या योजना आणि नागरिक यांच्यामधील माहितीची दरी कमी करणे आवश्यक आहे. स्थानिक भाषेत, सोप्या स्वरूपात आणि सहज उपलब्ध माध्यमातून माहिती देणे हे प्रशासनाच्या लोकाभिमुखतेचे महत्त्वाचे लक्षण ठरते.

माहितीचा अधिकार सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि शिक्षित व्यक्तींना कार्यालयीन प्रक्रिया समजून घेणे तुलनेने सोपे असते; परंतु ग्रामीण, आदिवासी, वंचित, महिला, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसमोर माहितीपर्यंत पोहोचण्याची अतिरिक्त आव्हाने असू शकतात. माहितीचा अधिकार या नागरिकांना आपल्या हक्कांबाबत प्रश्न विचारण्यासाठी कायदेशीर चौकट उपलब्ध करून देतो. मात्र कायदा अस्तित्वात असणे पुरेसे नाही. माहितीचा अधिकार प्रभावी होण्यासाठी नागरिकांना या कायद्याची जाणीव, अर्ज करण्याची प्रक्रिया, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती आणि अपीलच्या तरतुदी याबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

माहितीच्या अधिकारामुळे नागरिक आणि शासन यांच्यातील नात्यातही बदल घडतो. नागरिक हा केवळ शासकीय योजनांचा लाभार्थी नसून सार्वजनिक कारभाराविषयी प्रश्न विचारणारा घटक आहे, ही जाणीव अधिक दृढ होते. लोकशाहीत लोकप्रतिनिधी निवडून देणे ही नागरिकांची महत्त्वाची भूमिका असली, तरी त्यानंतरही सार्वजनिक जीवनातील नागरिकांचा सहभाग सुरू राहतो. विकासकामांची माहिती घेणे, सार्वजनिक सेवांबाबत प्रश्न उपस्थित करणे, उपलब्ध योजनांचा अभ्यास करणे आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हा लोकशाही सहभागाचाच भाग आहे. माहितीचा अधिकार या सहभागाला कायदेशीर आधार देतो.

या अधिकाराचा वापर करताना त्याची कायदेशीर चौकट समजून घेणे तितकेच आवश्यक आहे. प्रत्येक प्रकारची माहिती कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक करता येते, असे नाही. राष्ट्रीय सुरक्षा, काही संवेदनशील प्रशासकीय बाबी, वैयक्तिक गोपनीयता आणि कायद्यात नमूद केलेल्या इतर बाबींना काही परिस्थितीत अपवाद लागू होतात. त्यामुळे माहितीचा अधिकार हा अमर्यादित स्वरूपाचा अधिकार नसून कायद्याने निश्चित केलेल्या चौकटीत वापरला जाणारा अधिकार आहे. पारदर्शकता आणि गोपनीयता, सार्वजनिक हित आणि वैयक्तिक हक्क यांच्यात संतुलन राखणे ही आधुनिक लोकशाहीसमोरील महत्त्वाची गरज आहे.

डिजिटल क्रांतीमुळे माहितीपर्यंत पोहोचण्याची साधने मोठ्या प्रमाणात बदलली आहेत. आज शासनाच्या संकेतस्थळांवर विविध योजना, अधिसूचना, अहवाल, अंदाजपत्रके आणि सार्वजनिक माहिती उपलब्ध होत आहे. ऑनलाइन सेवा आणि डिजिटल नोंदींमुळे नागरिकांचा वेळ वाचतो आणि कार्यालयीन प्रक्रियेवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होते. परंतु डिजिटल माध्यमे उपलब्ध आहेत म्हणून माहितीचा समान प्रवेश सुनिश्चित झाला, असे म्हणता येत नाही. इंटरनेटची उपलब्धता, डिजिटल साक्षरता, भाषेची अडचण, तांत्रिक कौशल्याचा अभाव आणि डिजिटल साधनांची मर्यादित उपलब्धता यामुळे समाजातील काही घटक अजूनही माहितीच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहू शकतात.

म्हणूनच माहितीचा सार्वत्रिक प्रवेश म्हणजे केवळ माहिती इंटरनेटवर ठेवणे नव्हे. माहिती अचूक, अद्ययावत, समजण्यास सोपी, शोधण्यास सुलभ आणि विविध सामाजिक घटकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. विशेषतः दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभ डिजिटल संकेतस्थळे, ग्रामीण नागरिकांसाठी स्थानिक भाषेतील माहिती आणि डिजिटल साधनांपासून दूर असलेल्या नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. माहितीच्या लोकशाहीकरणाचा खरा अर्थ समाजातील प्रत्येक घटकाला माहितीच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यात आहे.

आज माहितीच्या उपलब्धतेबरोबरच माहितीच्या विश्वासार्हतेचा प्रश्नही महत्त्वाचा झाला आहे. सामाजिक माध्यमांमुळे माहितीचा प्रसार अभूतपूर्व वेगाने होत असला, तरी त्यातील प्रत्येक माहिती अचूक असेलच असे नाही. चुकीची माहिती, अपूर्ण माहिती, संदर्भहीन माहिती किंवा दिशाभूल करणारे संदेश समाजात वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहिती मिळविणे जितके आवश्यक आहे, तितकेच तिची सत्यता तपासणेही आवश्यक आहे. अधिकृत सरकारी संकेतस्थळे, कायदेशीर दस्तऐवज, मान्यताप्राप्त संस्थांचे अहवाल आणि विश्वसनीय माध्यमे यांचा संदर्भ घेण्याची सवय नागरिकांमध्ये विकसित होणे गरजेचे आहे. माहितीच्या अधिकाराबरोबरच माध्यम साक्षरता आणि डिजिटल साक्षरता हीदेखील आधुनिक नागरिकत्वाची आवश्यक कौशल्ये बनली आहेत.

प्रशासनाच्या पातळीवरही मोठ्या बदलांची आवश्यकता आहे. नागरिकांनी प्रत्येक मूलभूत माहितीसाठी स्वतंत्र अर्ज करावा लागणे ही पारदर्शक प्रशासनाची आदर्श स्थिती नाही. सार्वजनिक संस्थांनी कायद्यातील तरतुदींनुसार आवश्यक माहिती स्वयंस्फूर्तीने आणि नियमितपणे उपलब्ध करून देण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. विकासकामे, सार्वजनिक निधीचा वापर, विविध योजना, निविदा, सेवा वितरण, कार्यालयीन जबाबदाऱ्या आणि नागरिकांसाठी आवश्यक असलेली मूलभूत माहिती सहज उपलब्ध झाली, तर प्रशासनाविषयीचा विश्वास वाढण्यास मदत होऊ शकते. माहिती लपविण्यापेक्षा माहिती सहज उपलब्ध करून देणे ही आधुनिक लोकशाही प्रशासनाची दिशा असली पाहिजे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर माहितीचा अधिकार अधिक प्रभावी ठरू शकतो. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित संस्था आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक प्रकाशयोजना, आरोग्य सुविधा, स्थानिक कर आणि विविध विकासकामांबाबत नागरिकांना माहिती उपलब्ध झाली, तर स्थानिक लोकशाही अधिक सक्रिय होऊ शकते. ग्रामसभा किंवा स्थानिक सार्वजनिक चर्चांमध्ये अधिकृत माहितीचा वापर केल्यास विकासाच्या प्राधान्यक्रमांवर अधिक माहितीपूर्ण चर्चा होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ व्यक्तीचा कायदेशीर अधिकार नसून स्थानिक लोकशाही मजबूत करण्याचे साधनही आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठीही माहितीची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, रोजगार, स्वयंरोजगार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला-केंद्रित योजनांबाबत योग्य माहिती उपलब्ध झाल्यास महिलांना उपलब्ध संधी आणि हक्कांची जाणीव होऊ शकते. त्याचप्रमाणे आदिवासी आणि दुर्गम भागातील समुदायांना त्यांच्या भाषेत आणि त्यांच्या सामाजिक परिस्थितीला अनुरूप माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. माहितीची भाषा आणि स्वरूप हेही सामाजिक समावेशनाचे महत्त्वाचे घटक आहेत.


माहितीचा अधिकार जबाबदारीने वापरणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. माहिती मागण्याचा अधिकार हा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार असला, तरी त्याचा वापर सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि कायदेशीर हक्कांच्या चौकटीत होणे आवश्यक आहे. स्पष्ट आणि विशिष्ट माहिती मागितल्यास प्रशासनालाही अपेक्षित माहिती शोधून देणे अधिक सुलभ होते. मिळालेल्या माहितीचा संदर्भ समजून घेणे, तिची सत्यता तपासणे आणि आवश्यक असल्यास कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. अधिकार आणि जबाबदारी यांचा समतोल राखल्यास माहितीचा अधिकार अधिक प्रभावी लोकशाही साधन ठरतो.

माहितीच्या अधिकाराची खरी ताकद केवळ किती अर्ज दाखल झाले किंवा किती माहिती मिळाली यामध्ये नाही; तर माहितीमुळे नागरिकांच्या सार्वजनिक सहभागात किती वाढ झाली, प्रशासन अधिक पारदर्शक झाले का आणि सार्वजनिक संस्थांची उत्तरदायित्वाची संस्कृती किती मजबूत झाली, यामध्ये आहे. माहितीच्या आधारे नागरिकांनी प्रश्न विचारले, प्रशासनाने स्पष्ट उत्तरे दिली आणि सार्वजनिक संस्थांनी आपल्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणली, तर माहितीचा अधिकार लोकशाहीच्या दैनंदिन व्यवहाराचा प्रभावी भाग बनतो.

२८ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन आपल्याला याच मूलभूत सत्याची आठवण करून देतो की, माहितीपासून वंचित नागरिकाचा लोकशाही सहभाग मर्यादित होऊ शकतो. माहिती उपलब्ध झाली, समजली आणि तिचा योग्य वापर करण्याची क्षमता निर्माण झाली, तर नागरिक अधिक सक्षम होतो. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ सरकारी कागदपत्रे मिळविण्याचा मार्ग नाही; तो नागरिकांच्या आत्मविश्वासाचा, सार्वजनिक सहभागाचा आणि लोकशाही उत्तरदायित्वाचा आधार आहे.

आजच्या काळात शासन, तंत्रज्ञान आणि नागरिक यांच्यातील संबंध वेगाने बदलत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रशासन, सामाजिक माध्यमे आणि मोठ्या प्रमाणातील माहिती यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत, तसेच गोपनीयता, माहितीची सत्यता आणि डिजिटल विषमता यांसारखी आव्हानेही पुढे आली आहेत. या बदलत्या परिस्थितीत माहितीच्या अधिकाराची मूलभूत भावना अधिक महत्त्वाची ठरते कि सार्वजनिक जीवनाशी संबंधित आवश्यक माहिती नागरिकांपासून अनावश्यकपणे दूर राहू नये.

लोकशाहीची खरी शक्ती जागरूक नागरिकांमध्ये असते. जागरूकतेचा पाया माहितीमध्ये आहे आणि माहितीचा अधिकार त्या पायाला कायदेशीर बळ देतो. शासनाने पारदर्शकतेची संस्कृती विकसित करणे, प्रशासनाने नागरिकांना वेळेत आणि सुलभ माहिती उपलब्ध करून देणे आणि नागरिकांनी मिळालेल्या माहितीचा जबाबदारीने वापर करणे, या तिन्ही बाबी एकत्र आल्या तर लोकशाही अधिक सहभागी आणि उत्तरदायी होऊ शकते. म्हणूनच २८ सप्टेंबर हा दिवस केवळ माहितीच्या अधिकाराची आठवण करून देणारा दिवस नसून 'माहिती ही नागरिकशक्ती आहे' हा लोकशाहीचा मूलभूत संदेश अधोरेखित करणारा दिवस आहे. माहितीची दारे खुली असतील, प्रश्न विचारण्याची मुभा असेल आणि उत्तरदायित्वाची संस्कृती बळकट असेल, तरच लोकशाहीचा प्रवास अधिक व्यापक, समावेशक आणि अर्थपूर्ण होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)** * B©'ob - bagate.rajendra5gmail.com

## * पान १ वरुन *

*** SIR विरोधात देशव्यापी रान उठलं,.....**

आणि जबाबदाऱ्यांमध्ये करण्यात येणारे बदल आयोगाच्या माहितीत केले जातील.

SIR मधून नावे वगळल्यास अर्ज करता येतील

दरम्यान, आयोगाच्या मते, ज्यांची नावे SIR मधून वगळली आहेत, ते सध्या सुरू असलेल्या मतदार यादी अपडेट प्रक्रियेत समावेश करण्यासाठी संबंधित ERO कडे अर्ज करू शकतात. यामध्ये तरुण मतदार आणि प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांचा समावेश आहे. अशी नावे समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्याचे निर्देश आयोगाने CEO,DEO आणि ERO यांना दिले आहेत. आतापर्यंत, एसआयआर (SIR) दरम्यान ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मसुदा मतदार याद्यांमधून १३ कोटी नावे वगळण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या मते, देशात ९७ कोटीहून अधिक मतदार आहेत, म्हणजेच एसआयआरमध्ये अंदाजे १४ टक्क्यांहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आली.

**वात्रटिका**

**निवड(णू)क फटका**

धुराळा उडाला आणि
पळापळ सुरू झाली...
सगळ्यांच्या रडारवर
ती खुर्ची दिसू
लागली...।।
खुर्चीच्या खाली आणि
वर जबरदस्त मॅगनेट
आहे...
घाबरायचे नाही तो तर
अगदी वेल सेट
आहे...।।

**हणमंत पडवळ – धाराशिव**
**८६९८०६७५६६**

# श्री विठ्ठल मूर्ती संवर्धन कामाची जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून पाहणी

पंढरपूर(कटूसत्य वृत्त):-श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे दीर्घकालीन जतन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग व राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली मूर्ती संवर्धनाचे काम सुरू आहे. श्री विठ्ठल मूर्तीच्या संवर्धनाची प्रक्रिया सुरू असून, या कामाची पाहणी आज जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केली.



यावेळी मंदिर समितीचे सदस्या शकुंतला नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, शिवाजीराव मोरे, प्रांताधिकारी सचिन इतापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे डॉ. एस. विनोद कुमार, डॉ. विमल जयस्वाल, निलेश महाजन आदी उपस्थित होते. श्री विठ्ठल मूर्तीची संवर्धन प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक व शास्त्रीय पद्धतीने पार पाडण्यात येत आहे. मूर्तीच्या प्राचीन स्वरूपास, पावित्र्यास अथवा धार्मिक परंपरांना कोणतीही बाधा निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेऊन संवर्धनाचे काम पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिल्या. यावेळी श्री विठ्ठल सभा मंडप येथे मंदिर समितीच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या श्री गणेशाची आरती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आली. मूर्तीचे लायडर स्कॅनिंग श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींच्या संवर्धनाची प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी मूर्तींचे लायडर स्कॅनिंग करण्यात आले आहे. भविष्यातील संवर्धन प्रक्रियेसाठी हे स्कॅनिंग अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या माध्यमातून मूर्तींची डिजिटल ट्विन तयार करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात मूर्तीची झीज होत आहे किंवा नाही, तसेच झीज झाल्यास ती नेमकी कोणत्या भागात झाली आहे, याची शास्त्रीय पद्धतीने माहिती मिळणे शक्य होणार आहे. मूर्ती हाताळण्याबाबत पुजाऱ्यांना भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या तज्ज्ञांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे.

लायडर स्कॅनिंगचा अहवाल पुरातत्त्व विभागाकडून १२ दिवसांत सल्लागार समितीला सादर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी विविध गणेश मंडळांना दिल्या भेटी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज पंढरपूर येथील गणेश सेवा गणेशोत्सव मंडळ, शिवप्रेमी गणेशोत्सव मंडळ, शिवछत्रपती गणेशोत्सव मंडळ, न्यू छत्रपती संभाजी महाराज मित्र मंडळ व सहकार गणेशोत्सव मंडळ येथे भेट देऊन श्री गणेशाची मनोभावे आरती केली. यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी सचिन इतापे उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृदांवन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३

फोन- २१७३५५०५९२ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**

It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-2173550592 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# लोकनेते बाबुराव पाटील साखर कारखान्याच्या बॉयलरचे अग्निप्रदीपन

अनगर (कटूसत्य वृत्त):- यंदाचा आगामी गळीत हंगाम अत्यंत अडचणीच्या व प्रतिकूल परिस्थितीत सुरू करावा लागत आहे.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांनी जीवापाड जपलेल्या ऊसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे टनेज व उतारा कमी येण्याची शक्यता आहे. त्यातच केमिकलच्या दरात दीडपटीने वाढ झाली आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने साखरेची एमएसपी पाच हजार रुपये करावी तसेच रिकव्हरी दोन टक्क्यांनी घटणार असल्याने शेतकऱ्यांना एक हजार रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी लोकनेते बाबुराव पाटील साखर कारखान्याचे अध्यक्ष विक्रांत पाटील यांनी केली.



लक्ष्मीनगर येथील लोकनेते बाबुराव पाटील साखर कारखान्याच्या बॉयलर विभागात गुरुवारी बॉयलर अग्निप्रदीपन कार्यक्रम झाला. त्यानंतर उपस्थित ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांना मार्गदर्शन करताना पाटील बोलत होते. 'आम्ही बोलतो तेच करतो, मोठे बोलत नाही. ऊसाला जेवढा जास्त दर देता येईल, तेवढा देण्याचा आमचा प्रयत्न राहील,' अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

प्रारंभी ऊस उत्पादक शेतकरी नागराज पाटील व त्यांच्या पत्नी कल्पना पाटील यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा व अग्निपूजा करण्यात आली.

पौरोहित्य बाजीराव जोशी यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते लोकनेते बाबुराव पाटील अनगरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार यशवंत माने होते.

यावेळी यशवंत माने, देवानंद गुंड, नाना डोंगरे व अस्लम चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, अध्यक्ष विक्रांत पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, कार्यकारी संचालक ओमप्रकाश जोगदे, सभापती असलम चौधरी, नाना डोंगरे, संचालक प्रकाश चवरे, जिल्हा परिषद सदस्य लखन शिंदे, बालाजी नरुटे, धनाजी गावडे, सतीश काळे, सतीश भोसले, हनमंत पोटरे, जालिंदर लांडे, दीपक माळी, सुशील क्षीरसागर, रमेश माने, संजीव खिलारे, सचिन चव्हाण, राजकुमार पाटील, सहदेव कापसे, नवनाथ मसलकर, बाळासाहेब भोसले, ज्योती विरपे, हेमंत गरड आदींसह ऊस उत्पादक सभासद, शेतकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रकाश चवरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या पिंपळनेर व करकंब युनिटचे गव्हाण व मोळी पुजन संपन्न

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., या कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करंकब या कारखान्याचे ऊस गाळप हंगाम २०२६-२७ चा गव्हाण व मोळी पुजन समारंभ दोन्ही युनिटकडील जेष्ठ कर्मचा-यांचे शुभहस्ते व संचालक तथा मा.सभापती विक्रमसिंह शिंदे यांचे उपस्थितीत दि.२४/०९/२०२६ रोजी कारखाना कार्यस्थळावर पार पडला.



युनिट नं.१ कडील गव्हाण व मोळी पुजन समारंभ जेष्ठ कर्मचारी शिवाजी पाटील, रामचंद्र अडसुळ,.लक्ष्मण घोडके,.सुदन मोरे, कैलास डोके यांच्या शुभहस्ते सकाळी १० वाजता व युनिट नं.२ कडील गव्हाण व मोळी पुजन सतिश गोडसे, नारायण भारती,सतिश मिसाळ,ईश्वर बागुल व दादासाहेब पवार यांचे शुभहस्ते दुपारी १ वाजता संपन्न झाले. तसेच सदर दिवशी सकाळी श्री सत्यनारायण पुजा संचालक पंडीतराव पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.नंदाताई पाटील व संचालक अशोक मिस्कीन व सौ.भाग्यश्रीताई मिस्कीन यांच्या शुभहस्ते कारखाना कार्यस्थळवार संपन्न झाली.

सदर प्रसंगी कारखान्याचे संचालक तथा मा.सभापती विक्रमसिंह शिंदे,सौ.अमृताताई शिंदे, पोपट गायकवाड-व्हाईस चेअरमन, संचालक रमेश येवलेपाटील,पोपट चव्हाण, अशोक मिस्कीन,राजेश खोत,विलास कौलगे, सचिन देशमुख, संजय लोकरे,जितेंद्र गायकवाड,लाला मोरे,पंडीतराव पाटील,कैलास तोडकरी,राजाराम नाळे, राजाराम थोरात,श्रीकांत पाटील, पांडूरंग घाडगे, कारखान्याचे कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे, युनिट नं.२ चे जनरल मॅनेजर पोपट येलपले तसेच सभासद,ऊस पुरवठादार,कर्मचारी, ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरपूरच्या १५ वर्षीय आदित्यला अवयवदानातून मिळाले नवजीवन

## फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे यशस्वी हृदय प्रत्यारोपण

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर येथील १५ वर्षीय आदित्य जाधव याच्यावर फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे १७ जुलै २०२६ रोजी यशस्वी हृदय प्रत्यारोपण करण्यात आले. जवळपास तीन वर्षांपासून गंभीर हृदयविकाराशी झुंज देणाऱ्या आदित्यची प्रत्यारोपणानंतर प्रकृती सुधारली असून, ३१ ऑगस्ट रोजी त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. लवकरच पुन्हा शाळेत जाण्याची आणि मित्रांसोबत क्रिकेट खेळण्याची त्याला उत्सुकता आहे.

इयत्ता नववीत शिकणाऱ्या आदित्यला वारंवार आजारी पडणे, थोडीशी हालचाल केली तरी दम लागणे, हृदयाचे ठोके वाढणे तसेच पायांना सूज येणे असा त्रास होत होता. त्यामुळे त्याचे शाळेत जाणेही कमी झाले होते. मात्र त्याने शिक्षण सोडले नाही. घरी राहून त्याने अभ्यास सुरू ठेवला.

फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे तपासणी केल्यानंतर त्याच्या हृदयाच्या उजव्या बाजूला गंभीर समस्या असल्याचे आढळले. हृदयातील एका झडपेत मोठ्या प्रमाणात गळती, हृदयाच्या उजव्या बाजूचे कप्पे वाढणे आणि रक्त पंप करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे निदान झाले. दोन वर्षांपूर्वी त्याच्यावर हृदयाच्या झडपेची दुरुस्तीही करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही हृदय वाढत राहिल्याने पुढील तपासणीत हृदयाच्या उजव्या कप्प्याच्या स्नायूंशी संबंधित गंभीर आजाराचे निदान झाले.



प्रकृतीचा दैनंदिन जीवनावर होत असलेला परिणाम लक्षात घेऊन डॉक्टरांनी हृदय प्रत्यारोपण हा योग्य पर्याय असल्याचे सांगितले. आवश्यक तपासणीनंतर २० फेब्रुवारी २०२६ रोजी त्याचे नाव हृदय प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षा यादीत नोंदवण्यात आले. दाता हृदय उपलब्ध झाल्यास तातडीने मुंबईत पोहोचता यावे म्हणून आदित्यचे कुटुंब काही महिन्यांसाठी पुण्यात स्थलांतरित झाले होते. आदित्यचे वडील रिक्षा चालवतात, तर आई गृहिणी आहे.

वाशी, नवी मुंबई येथील एमजीएम न्यू बॉम्बे हॉस्पिटलमध्ये २२ वर्षीय तरुणीला मेंदू मृत घोषित केल्यानंतर तिचे हृदय आदित्यसाठी योग्य असल्याचे निश्चित झाले. दुःखाच्या प्रसंगीही दात्याच्या कुटुंबाने हृदयासह फुफ्फुसे, मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, आतडी आणि रक्तवाहिन्या दान करण्यास संमती दिली. या निर्णयामुळे अनेक रुग्णांना नवजीवनाची संधी मिळाली.

दाता कुटुंब, रुग्णालये, अवयव प्रत्यारोपणाशी संबंधित यंत्रणा, वैद्यकीय टीम, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून दाता हृदय फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे तातडीने पोहोचवण्यात आले. त्यानंतर हृदय शल्यचिकित्सक, हृदयरोग तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, अतिदक्षता विभागातील तज्ज्ञ, प्रत्यारोपण तज्ज्ञ, परिचारिका आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांतून आदित्यवर यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले.

फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडच्या बाल हृदयरोग विभागाच्या संचालक डॉ. स्नेहल कुलकर्णी म्हणाल्या, ''आदित्यचा प्रवास दाखवून देतो की मुलांमधील हृदयविकाराचे लवकर निदान आणि योग्य वेळी उपचार किती महत्त्वाचे असतात. मुलांमध्ये हृदयाची कार्यक्षमता कमी होण्याची लक्षणे अनेकदा वारंवार होणारे संसर्ग किंवा सामान्य थकवा समजून दुर्लक्षित केली जातात. त्यामुळे निदान होईपर्यंत उपचाराचे पर्याय मर्यादित होऊ शकतात.''

प्रत्यारोपण शल्यचिकित्सक आणि फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडचे हृदय व छातीच्या शस्त्रक्रिया विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. धनंजय मालनकर म्हणाले, ''आदित्यच्या उपचारातील वैद्यकीय आव्हानांपेक्षा त्याचा सकारात्मक दृष्टिकोन आमच्या लक्षात राहिला. तो उत्तम चित्र काढतो. अतिदक्षता विभागात कृत्रिम श्वसनयंत्राचा आधार काढल्यानंतर काही वेळातच तो भगवान विठ्ठल आणि गणपतीची चित्रे काढण्यात मग्न झाला होता.''


फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडच्या सुविधा संचालिका सुश्री रिंकू मवानी म्हणाल्या, ''स्वतःच्या दुःखाच्या काळातही अवयवदानाचा निर्णय घेणाऱ्या दात्याच्या कुटुंबाचे आम्ही मनापासून आभारी आहोत. अधिकाधिक रुग्णांना विशेष प्रत्यारोपण उपचार मिळावेत आणि त्यांना निरोगी आयुष्य जगण्याची संधी मिळावी यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत राहू.''

प्रत्यारोपणानंतर आदित्यची प्रकृती आता चांगली असून तो पुन्हा शाळेत जाण्यासाठी उत्सुक आहे. आजारामुळे दूर गेलेले क्रिकेटचे मैदान आणि मित्रांसोबतचे दिवस पुन्हा अनुभवण्याची त्याची इच्छा आहे. एका कुटुंबाच्या संघर्षाला दात्याच्या कुटुंबाच्या निर्णयाची साथ मिळाल्याने आदित्यला मिळालेले हे नवजीवन अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे ठरले आहे.

**अवयवदानाचा माणुसकीचा संदेश :**
**२२ वर्षीय तरुणीच्या कुटुंबाने दु:खाच्या प्रसंगीही अवयवदानाचा निर्णय घेतला. हृदय, फुफ्फुसे, मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, आतडी आणि रक्तवाहिन्या दान करण्यात आल्या. या निर्णयामुळे अनेक रुग्णांना नवजीवनाची संधी मिळाली.**

# संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा 'ज्ञानभक्ती स्त्रीशक्ती'तून होणार जागर

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या ज्ञान, भक्ती आणि समतेच्या विचारांचा जागर करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा 'ज्ञानभक्ती स्त्रीशक्ती' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सोमवार दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता सोलापुरात मुरारजी पेठेतील सुशील रसिक सभागृहात होणार आहे, अशी माहिती महापालिका स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांनी पत्रकार परिषदेत दिली.




महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने 'ज्ञानभक्ती स्त्रीशक्ती - लोकसंस्कृती आणि सांस्कृतिक वैभव सोहळा' या संकल्पनेतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.

संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा आणि भक्तिपरंपरेचा लोकसंस्कृतीशी असलेला अनुबंध विविध कलाविष्कारांतून उलगडला जाणार आहे. ज्ञान, भक्ती आणि स्त्रीशक्तीच्या विविध पैलूंना लोककला व सांस्कृतिक सादरीकरणाची जोड देण्यात आली आहे. या सोहळ्यात पंढरीनाथ कांबळे, विशाखा सुभेदार, अक्षता सावंत, जितेंद्र तुपे, कृष्णाई उळेकर, भूमिजा पाटील, जुई तनपुरे आणि शीतल पाटील हे कलावंत सहभागी होणार आहेत.कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, सोलापूरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जात असून, संतपरंपरा, वारकरी संप्रदाय, भक्ती, ज्ञान आणि महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे, असे सभापती रंजीता चाकोते यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस नगरसेविका अर्चना वडनाल, सुधा अळळीमोरे आदी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा व ४५ वा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ संपन्न

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याची अधिमंडळाची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २६.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कारखाना कार्यस्थळावर कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत धनंजय पाटील यांचे अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या सुरुवातीस श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे पुजन, कारखान्याचे संस्थापक-चेअरमन कर्मवीर कै. औदुंबरआण्णा पाटील, संस्थापक-व्हाईस चेअरमन यशवंतभाऊ पाटील, दिवंगत सर्व माजी चेअरमन यांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित जेष्ठ सभासदांचे शुभहस्ते करण्यात आले.



तसेच श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचा सन २०२६-२७ गळीत हंगामाचा ४५ वा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ शनिवार दिनांक २६.०९.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता जगद्गुरु संत श्री तुकोबाराय यांचे वंशज ह.भ.प.प्रा. श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर यांचे शुभहस्ते व होम पुजन अमोल अभिमान शेळके व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुरेखा, कारखान्याचे संचालक जनक माणिक भोसले त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. स्नेहल, कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड यांचे उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

तसेच सन २०२६-२७ चा ४५ वा गळीत हंगामाचा शुभारंभ श्री विठ्ठल सुतगिरणीचे चेअरमन दिनकर दत्तात्रय पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अरुणा यांचे शुभहस्ते कलश पुजन होवून उपस्थित कारखान्याचे जेष्ठ सभासद यांचे शुभहस्ते, कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील, व्हा. चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे, मार्गदर्शक स्वेरी शैक्षणिक संकुलाचे सचिव प्रा.बी.पी.रोंगे, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड तसेच शेतकरी, सभासद, तोडणी वाहतुक ठेकेदार, अधिकारी व कामगार यांचे उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

याप्रसंगी जगद्गुरु संत श्री तुकोबाराय यांचे वंशज ह.भ.प.प्रा.श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर हे यांनी आर्शिवाद रुपी शुभेच्छा देताना म्हणाले की, १२५०० मे. टन गाळप क्षमता असलेले महाराष्ट्रात हाताच्या बोटा एवढेच कारखाने आहेत, त्यामध्ये श्री विठ्ठल कारखाना आहे. हि गौरवाची बाब आहे, या कारखान्यात साखरे बरोबरच इतर उपपदार्थांची निर्मिती केली जाते, त्यामुळे हा कारखाना चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील यांचे मार्गदर्शनाखाली निश्चित प्रगतीपथावर राहील, अशी भावना व्यक्त केली आणि येणारा गळीत हंगाम यशस्वी होणेसाठी शुभेच्छा दिल्या.

वार्षिक सभेचे आरंभी कारखान्याचे कार्यलक्षी संचालक प्रा. तुकाराम मस्के यांनी सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले. कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता बब्रुवाहन रोंगे यांनी श्रध्दांजलीचा ठराव मांडला. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक, डी. आर. गायकवाड यांनी विषय पत्रीकेवरील विषयांचे वाचन केले. या सर्व विषयांना सभासदांनी आवाजी मतांनी व हात उंचावून मंजूरी दिली.

अधिमंडळाच्या ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील यांनी सन २०२५-२०२६ हंगामाचा अहवाल सादर केला.

मागील हंगामाचा लेखाजोखा मांडत असताना सन २०२२ पासून कारखान्याची असलेली आर्थिक परिस्थिती व वाढलेली गाळप क्षमता, कारखान्याने दिलेला ऊसाचा दर, यंत्रसामुग्रीमध्ये केलेली आधुनिक सुधारणा, कारखान्याच्या शैक्षणिक संकुलामध्ये केलेल्या सुधारणा, वृक्ष लागवड तसेच परिसर विकास यासह दिर्घकालीन अडकुन राहिलेले कर्मचाऱ्यांचे पगार, हुद्दा व कायम वर्गवारीचे विषय अशा विस्तृत विषयांवर भाष्य करत असताना १२५० टीसीडी क्षमता असणारा कारखाना येणाऱ्या हंगामात १२५०० टीसीडी क्षमतेने चालणार आहे. कारण मागील दोन वर्षात ८० कोटी रुपयेची गुंतवणूक करुन कारखान्यात आधुनिकीकरण दुरुस्तीकरण केलेले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आपला कारखाना १२५०० मे.टन प्रतिदिन क्षमतेने चालणार आहे. मागील चार वर्षामध्ये कारखान्याने एफ.आर.पी. पेक्षा जादा दर दिल्यामुळेही तोटा सहन करावा लागला आहे हे त्यांनी नमुद केले. तसेच सन २०२५-२६ मधील आसवणी, सहवीज निर्मिती प्रकल्पाचे माध्यमातुन झालेले उत्पादन व विक्रीचा अहवाल सभासदांसमारे मांडण्यात आला. यावेळी सभासदांच्या लेखी प्रश्नांची उत्तरे देताना मागील व चालू आर्थिक स्थिती व अडचणीचे विस्तृत विवेचन करुन सभासदांच्या सर्व प्रश्नांची व शंकेचे निरसन केले.

मागील काही दिवसांपासून समाजमाध्यमांव्दारे आपला कारखाना व कारखान्याचे संचालक मंडळाची बदनामी करण्याचा प्रयत्न काही कारखाना विरोधी भूमीका असणाऱ्या लोकांकडून केला जात आहे. अशा प्रवृतीच्या लोकांना कारखाना सभासद त्यांची योग्य जागा दाखवतील याची मला खात्री आहे. आज कारखान्याचे सभासदां समोर सर्व लेखाजोखा मांडून कारखान्यावर असलेले कर्ज फेडणेसाठी उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. कारखान्याचे आर्थिक नियोजन व विकास यामध्ये कसलीही तडजोड केली जाणार नाही, असे यावेळी त्यांनी सांगितले. आपले कारखान्याचे आसवनी प्रकल्पामध्ये सुधारणा करुन १०० के.एल.पी.डी. क्षमतेचा इथेनॉल प्रकल्पाचे काम सुरु केलेले होते, परंतु शासनाकडून इथेनॉल धोरण बंद केल्याने अडचण निर्माण झाली आहे. केंद्र शासनाचे धोरणामध्ये साखरेची किंमत कमी व ऊसाची किंमत जास्त अशी तफावत असले कारणाने महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांना नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. याकरिता साखरेचे किमान विक्री मुल्य (एम.एस.पी.) ४७०० ते ४८०० असणे गरजेचे असल्याचे सांगीतले.

कारखाना कार्यस्थळावर बायोसीएनजी ३ टन प्रकल्पाची बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्वावर उभारणी करुन प्रकल्प कार्यान्वीत केलेला आहे. पुढील वर्षी कारखाना मालकीचा ४ टन क्षमतेचा प्रकल्प उभा करणेचा मानस त्यांनी व्यक्त केला.

आपले कारखान्यामार्फत श्री विठ्ठल कृषी महाविद्यालयाची शासनाची मंजुरी मिळालेली असून शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून प्रत्यक्ष सुरु झालेले आहे. यासाठी विशेष करून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांचे यासाठी सहकार्य लाभले.

कारखान्याचे शैक्षणिक संकुलामध्ये सिनियर महाविद्यालय, इंग्लिश मेडियम स्कूल, आयटीआय, डी फार्मसी व बी फार्मसी तसेच बी.एड व एम.एड कॉलेज सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांचे कोट्यातुन कुस्ती संकुलासाठी २ कोटी निधी प्राप्त होणार असून त्यांचेही आभार व्यक्त केले. इंडोअर स्टेडिमसाठी प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे त्याकरीता रु.१.२५ कोटी निधी मंजूर झालेला असून सदर स्टेडियम मध्ये वेगवेगळे २८ खेळ खेळता येणार आहेत. तसेच हंगाम २०२४-२५ मध्ये गळीतास आलेल्या ऊसाला रु.३५००/- दर देणेचे जाहिर करण्यांत आलेला होता. त्यापैकी आजवर प्र.मे.टन रु.३००३/- अदा केलेले असून उर्वरीत रकमेपैकी माहे जानेवारीमध्ये जाहीर केलेनुसार रु.१००/- दिपावली सणासाठी अदा करणार असल्याचे सभासदांना सांगितले असून, उर्वरीत रक्कम टप्याटप्याने अदा केले जातील असे सांगितले.

तसेच कामगारांसाठी राज्यस्तरीय त्रिपक्षीय समितीच्या झालेल्या निर्णयानुसार माहे सप्टेंबर २०२६ पासून १० टक्के पगार वाढ लागू करणेत येणार आहे. याशिवाय दिपावली सणानिमित्त कामगारांना एक महिन्याचा पगार (८.३३ टक्के) बोनस देणार असल्याचे जाहिर केले. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे थकीत देय रकमेबाबत झालेल्या करारानुसार रक्कम अदा करणेस सुरु असून लवकरच ठरल्याप्रमाणे रक्कम अदा केली जाईल. सध्या कामावर असणारे कर्मचारी यांचे मागील ३१ महिन्याचे कारखाना बंद कालावधीतील कारखाना व कामगार यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार थकीत पगार व इतर देणी अदा करणेच्या अनुषंगाने मा. साखर आयुक्त यांनी कारखान्यातील भंगार विक्री करण्यास मंजुरी दिली असून लवकरच ठरल्याप्रमाणे त्यांची ही देणी अदा केली जातील.

उपस्थितीत सभासदांनी आजवर कारखान्यास व संचालक मंडळास दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करुन येणाऱ्या गळीत हंगामासाठी इतर कोणाच्याही भुलथापांना बळी न पडता १०० टक्के ऊस आपल्याच कारखान्याला पाठवावा, असे आवाहन केले.

या सभेसाठी संचालक सर्वश्री संभाजी भोसले, कालिदास पाटील, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, समाधान काळे, श्रीमती कलावती खटके, सौ. सविता रणदिवे, तज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, तानाजी बागल, सचिन शिंदे-पाटील, समाधान गाजरे, धनाजी खरात, उमेश मोरे, गणेश ननवरे, एम.एस.सी. बँकेचे प्रतिनिधी सी.एस. पाटील, मोठ्या संख्येने कारखान्याचे माजी संचालक, सभासद, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

सर्व उपस्थित सभासदांचे संचालक दिनकर चव्हाण यांनी आभार मानले व सुत्रसंचलन प्रा.नागटिळक यांनी केले.